# त्र्यंबकेश्वर पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर, जिल्हा नाशिक या संस्थेचा सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल

जा.क्र.स्था/३/ब/जिप/पंस त्र्यंबकेश्वर/नाशिक/२५२२

उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक
लेखाकोष भवन, तिसरा मजला,
जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवार,
नाशिक
दिनांक :- १९.१२.२००८

**प्रेषक,**

उपमुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**प्रति,**

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक

त्र्यंबकेश्वर पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर, जिल्हा नाशिक या संस्थेचे सन २००७ – २००८ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षण श्री. सु. ध. ठाकरे, सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक ११.९.२००८ ते २६.९.२००८ या कालावधीत पुर्ण केले. सदर अहवालाचे पुनर्विलोकन श्री. उ. प्र. जोशी, लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक २३.१०.२००८ रोजी केले आहे. लेखापरीक्षण अहवालावर चर्चा करुन अंतिमीकरण श्री. वि. ए. कोते, उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक यांनी दिनांक ३.११.२००८ रोजी केले.

लेखापरीक्षीत आर्थिक वर्षामध्ये खालीलप्रमाणे पदाधिकारी व अधिकारी संस्थेचे कामकाज पहात होते.

**सभापती**

| | |
|---|---|
| श्रीमती. अंजना सुरेंद्र राऊत | १.४.२००७ ते ३१.३.२००८ |

**गटविकास अधिकारी**

| | |
|---|---|
| श्री. सी. एल. पवार (प्रभारी) | १.४.२००७ ते ६.६.२००७ |
| श्री. एल. एम. पवार | ७.६.२००७ ते ८.७.२००७ |
| श्री. जी. बी. कटारे | ९.७.२००७ ते १.८.२००७ |
| श्री एल. एम. पवार | २.८.२००७ ते २९.११.२००७ |
| श्री. एन. एम. महाजन (प्रभारी) | ३०.११.२००७ ते १.१.२००८ |
| श्री. सी. एल. पवार (प्रभारी) | २.१.२००८ ते ३१.३.२००८ |

# भाग पहिला
# (मागील लेखा परीक्षण )

मागील लेखापरीक्षण अहवालातील खालील परिच्छेद थकीत असुन त्याबाबत मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे स्वतंत्र पत्र व्यवहार सुरु आहे.

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>वर्ष</th><th>परिच्छेद क्रमांक</th><th>परि. संख्या</th></tr>
<tr><td>१</td><td>२००२-०३</td><td>४,५,६,७</td><td>४</td></tr>
<tr><td>२</td><td>२००३-०४</td><td>५,६,७</td><td>३</td></tr>
<tr><td>३</td><td>२००४-०५</td><td>३,७,८,९,११,१२<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षण पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट<br>परि.क्र.७ :- जवाहर रोजगार योजनेअंतर्गत विहिर बांधकामे (४.३३२)</td><td>६</td></tr>
<tr><td>४</td><td>२००५-०६</td><td>३,४,५,६,७,८,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८<br>पंचायत राज समिती लेखा परीक्षण पुनर्विलोकन अहवालात समाविष्ट<br>परि.क्र.४ :- पं.स.सेस अनुदानातून ग्रामस्थांना हगणदारीमुक्त गाव करणेसाठी १००% अनुदानातून शौचालयासाठी संडासभांडे वाटप करणे (४.६१०)<br>परि.क्र.५ :- प्राथमिक आरोग्य केंद्र येथील बाह्यरुग्ण फी तात्पुरते अपहाराबाबत (४.१९१)<br>परि.क्र.१३ :- हातपंप व विद्युतपंप वर्गणी थकबाकी वसूलीबाबत (४.७३०(१४)<br>परि.क्र.१६ :- अपूर्ण बांधकामाबाबत (४.७२८(३३))</td><td>१५</td></tr>
<tr><td>५</td><td colspan="2">सन २००६ – २००७</td><td></td></tr>
<tr><td colspan="4">परिच्छेद क्रमांक :- ६ :- वाहन क्र. एम.एच.-१५ के ७०५४ बाबत.</td></tr>
<tr><td colspan="4">परिच्छेद क्रमांक :- ७ :- वाहन रोजनिशीतील अनियमितता.</td></tr>
<tr><td colspan="4">परिच्छेद क्रमांक :- ८ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर केल्याबाबत</td></tr>
<tr><td colspan="4">परिच्छेद क्रमांक :- १३ :- जिल्हा निधी रोकडवहीतील अनियमिततांबाबत. (पंरास प्रस्तावित)</td></tr>
<tr><td colspan="4">परिच्छेद क्रमांक :- १४ :- जिल्हा निधी / अभिकरण योजना निधीकडील प्रमाणके उपलब्ध न झाल्याबाबत. (पंरास प्रस्तावित)</td></tr>
<tr><td colspan="4">परिच्छेद क्रमांक :- १५ :- धनादेश पोहच पावत्या उपलब्ध न केलेबाबत.</td></tr>
<tr><td colspan="4">परिच्छेद क्रमांक :- १६ :- संबंधितांना लिहिलेले धनादेश प्रदान न केलेबाबत (पंरास प्रस्तावित)</td></tr>
<tr><td colspan="4">परिच्छेद क्रमांक :- १९ :- संबंधितांना लिहिलेले धनादेश प्रदान न केलेबाबत (पंरास प्रस्तावित)</td></tr>
<tr><td colspan="4">परिच्छेद क्रमांक :- २० :- वित्तप्रेषणापेक्षा जादा झालेल्या खर्चाबाबत.</td></tr>
<tr><td colspan="4">परिच्छेद क्रमांक :- २१ :- तालुका मास्तर कार्यालयाकडील रोकडवही अपूर्ण असल्याबाबत.</td></tr>
</table>

| |
|---|
| परिच्छेद क्रमांक :- २२ :- ग्रामशिक्षण समितीच्या नावे काढलेले धनादेश बँक खाते (A/C PAY) रेखांकित न काढल्याबाबत. |
| परिच्छेद क्रमांक :- २३ :- इयत्ता ८ वी ते १० वी मधील अनुसुचित जातीतील मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीचा लाभ देणेबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक :- २४ :- एकात्मिक बाल विकास विभाग, पंचायत समिती त्र्यंबक हरसूल प्रकल्पातील रोकडवहीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक :- २५ :- मालमत्ता नोंदवहीबाबत (नं. ३९) लघुपाटबंधारे हरसूल ता. त्र्यंबक, जि. नाशिक |
| परिच्छेद क्रमांक :- २६ :- महत्त्वाच्या नोंदवह्या न ठेवल्याबाबत. |
| परिच्छेद क्रमांक :- २७ :- निवृत्ती वेतन आदेश नोंदवहीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक :- ३१ :- जामीनदार हयात व लायक असलेचे दाखले न घेतलेबाबत. |
| परिच्छेद क्रमांक :- ३३ :- अनामत नोंदवहीबाबत. |
| परिच्छेद क्रमांक :- ३४ :- हातपंप व विद्युतपंप वर्गणी थकबाकी वसुलीबाबत. (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक :- ३५ :- अपूर्ण बांधकामाबाबत (कृषी विभाग-त्र्यंबकेश्वर) (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक :- ३६ :- अपूर्ण बांधकामाबाबत (लघुपाटबंधारे - त्र्यंबकेश्वर) (पंरास प्रस्तावित) |
| परिच्छेद क्रमांक :- ३७ :- लेखापरीक्षणास दप्तर उपलब्ध न होणेबाबत. (पंरास प्रस्तावित) |

**टिप:-** उपरोक्त नमुद केलेल्या आक्षेपांचे संदर्भात त्या त्या वर्षाच्या पुढील अभिप्रायांमध्ये नमुद केलेले आक्षेप क्रमांकच अंतीम समजणेत यावेत:

## भाग दुसरा
## ( चालु लेखा परीक्षण )

---

**परिच्छेद क्रमांक ३ :- पंचायत समिती सेसचे अंदाजपत्रक.**

पंचायत समिती त्र्यंबकेश्वरचे सन २००७ – २००८ चे उपकराचे सुधारीत अंदाजपत्रक ठराव क्रमांक ५८ दिनांक ११.१.२००८ अन्वये मंजुर केलेले आहे. प्रत्येक शिर्षाखाली केलेल्या तरतुदीचा व प्रत्यक्ष खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

(आकडे रुपयांत)

| अ.क्र. | लेखाशिर्ष | सुधारीत तरतुद | प्रत्यक्ष खर्च | कमी खर्च | जादा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | शिक्षण | २,००० | -- | २,००० | -- |
| २ | बांधकाम | ५०,००० | ३३,२४६ | १६,७५४ | -- |
| ३ | शेती | ५०,००० | ४९,६४४ | ३५६ | -- |
| ४ | लघुपाटबंधारे | १,००० | -- | १,००० | -- |
| ५ | सार्व.आरोग्य | २,००० | -- | २,००० | -- |
| ६ | पशुसंवर्धन | २०,००० | १९,९७८ | २२ | -- |
| ७ | समाजकल्याण | १,०५,३५१ | १,०६,३८० | -- | १,०२९ |
| ८ | ए.बा.वि.से.योजना | ४०,००० | ३९,९९५ | ५ | -- |
| | **एकूण** | २,७०,३५१ | २,४९,२४३ | २२,१३७ | १,०२९ |

सदरचे अंदाजपत्रक व खर्चाबाबत पुढील अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) सन २००७ – २००८ चे अंदाजपत्रक पंचायत समितीने नियोजनपूर्वक वस्तुस्थितीस धरुन केल नसल्याचे दिसून येते. आर्थिक वर्षात शिक्षण, लघुपाटबंधारे, सार्व. आरोग्य यांवर कोणतीही रक्कम खर्च केलेली नाही. या कमी करण्यात आलेल्या खर्चाबाबत पंचायत समिती सभेचे क्षमापन सादर करावे.

२) मा. जिल्हाधिकारी / तहसिलदार, त्र्यंबक यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून दिनांक ३१.३.२००८ अखेर किती उपकर वसूल झाला याचा तपशील पंचायत समितीस प्राप्त झाला नाही. तरी याबाबत त्वरीत संपर्क साधून ताळमेळ घ्यावा व उपकराच्या सर्व रक्कमा प्राप्त झाल्याचे प्रमाणित करुन अनुपालन दर्शवावे.

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (अ) खाली येणा-या अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक ४ :- पंचायत समिती सेसमधून (१००% अनुदानावर) सौर कंदील पुरविणेबाबत.**

पंचायत समिती, त्र्यंबकेश्वरचे सन २००७ – २००८ मध्ये पंचायत समिती सेस अंतर्गत सौरकंदील खरेदीसाठी खालीलप्रमाणे खर्च केला आहे.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम रु. | तपशिल |
|---|---|---|---|
| ३ | २८.३.२००८ | १,०६,३८० | जैन इरीगेशन सिस्टीम लि. यांचेकडून ३० सौर कंदील रुपये ३,५४६/- या दराने खरेदी केलेले आहेत. |
| | एकूण | १,०६,३८० | |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) पंचायत समिती ठराव क्रमांक ५२ दिनांक ११.१.२००८ नुसार सदरच्या योजनेची निवड करण्यांत आलेली आहे. मात्र त्यामध्ये लाभार्थी यादी नमुद नाही. त्यामुळे लाभार्थी निवड कशाच्या आधारे केली याबाबत पडताळणी करता आलेली नाही

२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र. झेडपीए-२०००/ प्र.क्र.४१/३३ दिनांक १७.१.२००१ नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यांत आलेली नाही.

३) मास्टर नोंदवहीत यापूर्वीच्या नोंदी नसल्याने एकाच लाभार्थ्यास दुबार लाभ देण्यांत आला किंवा कसे याची लेखापरीक्षणात पडताळणी करता आलेली नाही.

४) सदरचे सौर कंदील महाउर्जाकडील दरकरार क्र. आय.एन/एसपीव्ही -५७/५८१८/ ०६ दिनांक १३.९.२००६ नुसार केलेल्या दरकरारानुसार खरेदी करण्यांत आलेले आहेत. सदरच्या दरकरारातील अटी व शर्तीनुसार पुढील ५ वर्षासाठीच्या सर्वकष दुरुस्ती व देखभालीस (Comprehensive Repair & Maintainance) पुरवठादार बांधील राहावा यासाठी त्यांचेकडून करारनामा घेणे बंधनकारक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

५) श्री. भगवान रामजी चौधरी (ठाणपाडा) व श्री. भगवान कृष्णा भोये (ठाणपाडा) यांचे अर्ज अपूर्ण आहेत.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे. तोपर्यंत सदरची रक्कम रुपये १,०६,३८०/- आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
आक्षेपाधिन रक्कम रुपये १,०६,३८०/-
पंचायत समिती सेस

## परिच्छेद क्रमांक ५ :- पंचायत समिती सेसमधून (५०% अनुदानावर) सौर कंदील पुरविणेबाबत.

पंचायत समिती, त्र्यंबकेश्वरने सन २००७ – २००८ मध्ये पंचायत समिती सेस अंतर्गत सौरकंदील खरेदीसाठी खालीलप्रमाणे खर्च केला आहे.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम रु. | तपशिल |
|---|---|---|---|
| २ | २८.३.२००८ | ४९,६४४ | जैन इरीगेशन सिस्टीम लि. यांचेकडून २८ सौर कंदील रुपये ३,५४६/- या दराने खरेदी केलेले आहेत. |
| | एकूण | ४९,६४४ | |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) पंचायत समिती ठराव क्रमांक ५३ दिनांक ११.१.२००८ नुसार सदरच्या योजनेची निवड करण्यांत आलेली आहे. मात्र त्यामध्ये लाभार्थी यादी नमुद नाही. त्यामुळे लाभार्थी निवड कशाच्या आधारे केली याबाबत पडताळणी करता आलेली नाही

२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र. झेडपीए-२०००/ प्र.क्र.४१/३३ दिनांक १७.१.२००१ नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यांत आलेली नाही.

३) मास्टर नोंदवहीत यापूर्वीच्या नोंदी नसल्याने एकाच लाभार्थ्यांस दुबार लाभ देण्यांत आला किंवा कसे याची लेखापरीक्षणात पडताळणी करता आलेली नाही.

४) सदरचे सौर कंदील महाउर्जाकडील दरकरार क्र. आय.एन/एसपीव्ही -५७/५८१८/०६ दिनांक १३.९.२००६ नुसार केलेल्या दरकरारानुसार खरेदी करण्यांत आलेले आहेत. सदरच्या दरकरारातील अटी व शर्तीनुसार पुढील ५ वर्षासाठीच्या सर्वकष देखभाली व दुरुस्तीस मक्तेदार बांधील राहावा यासाठी त्यांचेकडून करारनामा घेणे बंधनकारक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे. तोपर्यंत सदरची रक्कम रुपये ४९,६४४/- आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
आक्षेपाधिन रक्कम रुपये ४९,६४४/-
पंचायत समिती सेस

**परिच्छेद क्रमांक :- ६ :- पंचायत समिती सेसमधून अंगणवाडी केंद्रातील बालकांचे वजन घेणेकामी झोळ्या खरेदी करणेबाबत.**

पंचायत समिती त्र्यंबकने सन २००७ – २००८ मध्ये पंचायत समिती सेस अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचे वजन घेणेकामी झोळ्या खरेदीसाठी खालीलप्रमाणे खर्च केला आहे.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम रु. | तपशिल |
|---|---|---|---|
| ४ | ३१.३.२००८ | ३९,९९५ | मे. अनिल एंटरप्रायजेस्, नाशिक यांचेकडून ४२१ झोळ्या रुपये ९५/- प्रति नग या दराने; दरपत्रके मागवून खरेदी केलेले आहेत. |
| | एकूण | ३९,९९५ | |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) पंचायत समिती ठराव क्रमांक ५५ दिनांक ११.१.२००८ नुसार सदरच्या योजनेची निवड करण्यांत आलेली आहे. मात्र त्यामध्ये लाभार्थी अंगणवाड्यांचे प्रस्ताव घेऊन त्यांची यादी घेण्यांत आलेली नाही. त्यामुळे लाभार्थी अंगणवाड्यांची निवड कशाच्या आधारे केली याबाबत पडताळणी करता आलेली नाही

२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र. झेडपीए-२०००/प्र.क्र.४१/३३ दिनांक १७.१.२००१ नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यांत आलेली नाही.

३) मास्टर नोंदवहीत यापूर्वीच्या नोंदी नसल्याने एकाच लाभार्थ्यांस दुबार लाभ देण्यांत आला किंवा कसे याची लेखापरीक्षणात पडताळणी करता आलेली नाही.

४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ७९ नुसार मागणीप्रमाणे माल उपलब्ध झाल्याबाबतचे गटविकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र तपासणीस उपलब्ध झालेले नाही.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पुर्तता होईपावेतो रक्कम रुपये ३९,९९५/- आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
आक्षेपाधिन रक्कम रुपये ३९,९९५/-
पंचायत समिती सेस

---

**परिच्छेद क्रमांक :- ७ :- पंचायत समिती सेसमधून सभापती यांचे निवासस्थान दुरुस्ती करणेबाबत.**

पंचायत समिती त्र्यंबकेश्वरने सन २००७ – २००८ मध्ये पंचायत समिती सेसमधून सभापती यांचे निवासस्थान दुरुस्तीवर खर्च केला आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| प्रशासकीय मान्यता | ठराव क्रमांक २ दिनांक ९.४.२००७ |
| तांत्रिक मान्यता | क्र. जिपना/बांखा/इवद-१/८८४/दि. २५.१०.२००७ |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रुपये ५०,०००/- |
| लेखाशिर्ष | पंचायत समिती सेस |
| मक्तेदाराचे नाव | पांडूरंग मागास मजूर बांधकाम सह. संस्था. |
| कार्यादेश क्र. | जिपना/बांखा/इवद-१/टेंडर/५३७/०७ दि.२७.१२.२००७ |
| कामाची मुदत | दि. २७.२.२००८ पर्यंत |
| कामावरील खर्च | रु. ३३,२४६/- |
| प्र.क्र. व दिनांक | ५/३१.३.२००८ |
| मोजमाप पुस्तिका क्र. | १३० पृष्ठ क्रमांक २६ ते ३१ |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेतः

१) उपरोक्त कार्यादेशाप्रमाणे दिनांक २७.२.२००८ पर्यंत काम पूर्ण करणे आवश्यक होते. तथापि दिनांक ३१.३.२००८ अखेर पर्यंत काम अपूर्ण स्थितीत असतांना दिनांक ३१.३.२००८ रोजी प्रथम धावते देयक रक्कम रुपये ३३,२४६/- प्रदान केलेले आहे. यावरुन अनुदान खर्च करण्याच्या उद्देशानेच खर्च नोंदविल्याचे स्पष्ट होते. तसेच मुदत संपलेली असतांना कोणतीही मुदतवाढ दिलेली नाही. या अनुषंगाने दंडनीय कार्यवाही करुन अनुपालन दर्शवावे.

२) मोजमाप पुस्तिका क्र. १३० पृष्ठ क्रमांक २६ ते ३१ वर नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र त्यावर गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी घेण्यांत आलेली नाही. म्हणजे गटविकास अधिकारी यांनी मोजमाप पुस्तिकेची तपासणी न करताच प्रथम धावते देयक प्रदान केलेले आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घेऊन पुर्तता दर्शवावी.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पुर्तता होईपावेतो रक्कम रुपये ३३,२४६/- आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष
आक्षेपाधिन रक्कम रुपये ३३,२४६/-
पंचायत समिती सेस

---

## <u>मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ब) खालील येणारी अनियमितता.</u>

(कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे किंवा गैरवर्तणूकीमुळे झालेल्या नुकसानीविषयक आक्षेप)

---

## परिच्छेद क्रमांक :- ८ :- डिझेल टाकी क्षमतेपेक्षा जादा डिझेल खरेदीबाबत.

### (अ) डिझेल टाकी क्षमतेपेक्षा जादा डिझेल खरेदीबाबत –

गटविकास अधिकारी, पंचायत समिती त्र्यंबक यांचेकडील जीप क्रमांक एम. एच. १५ अेअे ५०२१ ची सन २००७ – २००८ साठीची वाहन रोजनिशी तपासली असता डिझेल टाकीची क्षमता ६० लिटर असल्याने क्षमतेपेक्षा जादा शिल्लक दर्शविलेल्या १६ लिटर डिझेलचे तपशील खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | माहे जूलै २००७ शिल्लक डिझेल | १५ लिटर |
| २) | माहे ऑगस्ट (१७.८.२००७) पर्यंत खरेदी डिझेल | २०५ लिटर |
| ३) | एकूण | २२० लिटर |
| ४) | दिनांक १७.८.२००७ ची फिरती कि.मी. | २२२२ कि.मी. |
| ५) | प्रति कि.मी. १०.८९ सरासरी डिझेल खर्च | २०४ लिटर |
| ६) | दि. २१.८.२००७ रोजीची शिल्लक | १६ लिटर |
| ७) | तुंगार पेट्रोल पंप त्र्यंबक यांचेकडून डिझेल खरेदी पावती क्र. १४५०० दि. २१.८.२००७ | ६० लिटर |
| ८) | एकूण | ७६ लिटर |

वरीलप्रमाणे टाकीच्या क्षमतेपेक्षा जादा डिझेलची किंमत रुपये ५६५/- वसूल करुन पुर्तता दर्शवावी.

### (ब) खरेदी केलेल्या डिझेलची नोंद लॉगबुकात नसल्याबाबत –

प्रमाणक क्रमांक ३४ दिनांक १८.३.२००८ रक्कम रुपये १४,६७६/- मध्ये खालील उपप्रमाणकात खरेदी केलेल्या डिझेलची नोंद वाहन क्रमांक एम. एच.१५ अे. अे. ५०२१ लॉगबुकात घेतली नाही त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र. | दिनांक | बील क्रमांक | डिझेल (लिटर) | रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | २७.१२.२००६ | १७९६३ | ५.८५ | २००.०० |
| २ | २२.०३.२००७ | ३७११३ | ४० | १३७६.४० |
| ३ | २६.४.२००७ | १२२१९ | १० | ३४१.०० |
| | | | **एकूण** | **१९१७.४०** |

वरीलप्रमाणे रक्कम रुपये १,९१७/- वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

**(क) शिल्लक डिझेल कमी नोंदविल्याबाबत.**

वाहन क्रमांक एम. एच.१५ अे. अे. ५०२१ चे लॉगबुक तपासले असता खालीलप्रमाणे डिझेल कमी नोंदविले आहे.

| | |
|---|---|
| माहे मार्च २००८ डिझेल खरेदी | २७५.०६ |
| माहे फेब्रुवारी २००८ शिल्लक डिझेल | ४.६८ |
| एकूण | २७९.७४ |
| माहे मार्च फिरती कि.मी. २४३४ प्रति कि.मी. ११.२६ | २१६.०० |
| प्रत्यक्षात शिल्लक डिझेल | ६३.५८ |
| लॉगबुकात शिल्लक डिझेल | १३.३२ |
| लॉगबुकात कमी दर्शविलेले डिझेल (दर ३५.३४) | ५०.२६ |

वरीलप्रमाणे रक्कम रुपये १,७७६/- वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

(ड) माहे जोनवारी २००८ चे वाहन लेखे तपासले असता खालीलप्रमाणे शिल्लक डिझेल कमी नोंदविले आहे. – (एम. एच.१५ अे. अे. ५०२१)

| | |
|---|---|
| फिरती कि.मी. १७३५६३ ते १७८७७३ | ५२१०.०० |
| प्रति कि.मी. सरासरी ११.८ | ११.८० |
| प्रत्यक्षात महिन्यात खर्च झालेले डिझेल | ४४१.०० |
| लॉगबुकात खर्च नोंदवलेले डिझेल | ४७०.०० |
| जादा नोंदविलेले डिझेल | २९.०० लिटर |
| वसूलपात्र रक्कम रुपये ३५.३४ | १०२५.०० |

उपरोक्त रक्कम रुपये १०२५/- संबंधितांकडून वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

गोषवारा - वसूलपात्र रक्कम
(अ) रक्कम रुपये ५६५/-
(ब) रक्कम रुपये १,९१७/-
(क) रक्कम रुपये १,७७६/-
(ड) रक्कम रुपये १,०२५/-
एकूण वसूलपात्र रक्कम रुपये ५,२८३/-

---

**परिच्छेद क्रमांक :- ९ :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापराबाबत.**

सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणाचेवेळी पंचायत समिती त्र्यंबकचे वाहन एम. एच. १५ ए.ए. ५०२१ च्या वाहन लेख्याची पडताळणी करण्यांत आली असता खालील

दिलेल्या तपशिलाप्रमाणे वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर प्रवास केल्याच्या नोंदी आढळून आल्या. वाहन वापरण्यापूर्वी सक्षम वरिष्ठ अधिका-यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही झालेली नाही.

| अ.क्र. | दिनांक | कोठून | कोठे | तपशील | कि.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १७.०५.२००७ | त्र्यंबक | नाशिक | कार्यालयीन काम | ७२ |
| २ | ०८.०६.२००७ | त्र्यंबक | इगतपुरी | कार्यालयीन काम | १४० |
| ३ | १९.०६.२००७ | त्र्यंबक | नाशिक | कार्यालयीन काम | ६५ |
| ४ | २६.०६.२००७ | त्र्यंबक | नाशिक | कृषि साहित्य आणणेकामी | १३२ |
| ५ | १७.०७.२००७ | त्र्यंबक | नाशिक | कार्यालयीन काम | ८० |
| ६ | १३.०८.२००७ | त्र्यंबक | नाशिक | कार्यालयीन काम | १५५ |
| ७ | १४.०८.२००७ | त्र्यंबक | नाशिक | कार्यालयीन काम | ६० |
| ८ | १६.१०.२००७ ते १७.१०.२००७ | त्र्यंबक | मुंबई | उद्‍घाटन कामी | ६५० |
| ९ | १२.११.२००७ | त्र्यंबक | नाशिक | कार्यालयीन काम | १३० |
| १० | १३.११.२००७ | त्र्यंबक | नाशिक | कार्यालयीन काम | १२५ |
| ११ | १४.११.२००७ | त्र्यंबक | नाशिक | कृषी साहित्य आणणे कामी | १२१ |
| १२ | १५.११.२००७ | त्र्यंबक | नाशिक | मा. सभापती | २४९ |
| १३ | ०४.१२.२००७ | त्र्यंबक | नाशिक | मा. सभापती | २२१ |
| १४ | १०.१२.२००७ | त्र्यंबक | नाशिक | मा. सभापती | १०५ |
| १५ | १५.१२.२००७ | त्र्यंबक | नाशिक | कृषी | १२५ |
| १६ | १८.१२.२००७ | त्र्यंबक | नाशिक | बैठक | ८१ |
| १७ | ०४.०१.२००८ | त्र्यंबक | नाशिक | मिटींग | २२८ |
| १८ | १८.०१.२००८ | त्र्यंबक | नाशिक | क्रिडा | २४२ |
| १९ | २०.०१.२००८ | त्र्यंबक | नाशिक | क्रिडा | २११ |
| २० | २२.०१.२००८ | त्र्यंबक | नाशिक | बैठक | ६२ |
| २१ | ३०.०१.२००८ | त्र्यंबक | जळगाव | संतगाडगेबाबा अभियान | ३४६ |
| २२ | ३१.०१.२००८ ते १.२.२००८ | त्र्यंबक | जळगाव | संतगाडगेबाबा अभियान | ३७२ |
| २३ | १५.०२.२००८ | त्र्यंबक | नाशिक | हगणदारी मुक्त बैठक | ६५ |
| २४ | १६.०२.२००८ | त्र्यंबक | नाशिक | स्टेशनरी आणणे | २१५ |
| २५ | ०२.०३.२००८ | त्र्यंबक | नाशिक | पं.स.सदस्य आणणे कामी | १३० |
| | | | | | ४३८२ |

शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र. जेईपी/२४६९/१७७०३/डी-१/ दिनांक १४.११.१९६९ अन्वये वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी

यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच शासन निर्णय ग्रा.वि.वि.क्र. जेईपी/१०/सीआर/५९/००/०५ दिनांक २४.४.२००० अन्वये पूर्वपरवानगी शिवाय त्यांचे वापरातील वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरल्यास कार्योत्तर मंजूरी अनुज्ञेय नाही.

शासन निर्णय वित्त विभाग क्र.प्रवास/१००५/प्रक्र३३/सेवा ५/दि.८.७.२००५ नुसार कार्यक्षेत्राबाहेरील प्रवासास एकूण किलोमीटर ४,३८२ ची रुपये ८/- प्रति कि.मी. प्रमाणे संबंधितांकडून रुपये ३५,०५६/- वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

वसुलपात्र रक्कम रुपये ३५,०५६/-

---

**परिच्छेद क्रमांक :- १० :- वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापराबाबत.**

सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षणाचेवेळी पंचायत समिती त्र्यंबकचे वाहन एम. एच. १५ के ७०५४ च्या वाहन लेख्याची पडताळणी करण्यांत आली असता खालील दिलेल्या तपशिलाप्रमाणे वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर प्रवास केल्याच्या नोंदी आढळून आल्या. वाहन वापरण्यापूर्वी सक्षम वरिष्ठ अधिका-यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही झालेली नाही.

| अ.क्र. | दिनांक | कोठून | कोठे | तपशील | कि.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १३.०४.२००७ | हरसुल | नाशिक | कार्यालयीन काम | १०२ |
| २ | १२.०४.२००७ | हरसुल | नाशिक | कार्यालयीन काम | १७५ |
| ३ | २१.०४.२००७ | हरसूल | नाशिक | कार्यालयीन काम | ११० |
| ४ | २४.०५.२००७ | हरसूल | नाशिक | कार्यालयीन काम | ६० |
| ५ | २३.०६.२००७ | हरसुल | नाशिक | कार्यालयीन काम | १३८ |
| ६ | ०३.०८.२००७ | हरसुल | नाशिक | कार्यालयीन काम | १२० |
| ७ | १८.०८.२००७ | हरसुल | नाशिक | कार्यालयीन काम | ६० |
| ८ | २२.०८.२००७ | हरसुल | नाशिक | कार्यालयीन काम | ११५ |
| ९ | २४.०८.२००७ | हरसुल | नाशिक | कार्यालयीन काम | १२५ |
| १० | ०५.०२.२००८ ते ८.२.२००८ | हरसूल | नाशिक | कार्यालयीन काम | १४७ |
| | | | | | ११५२ |

शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र. जेईपी/२४६९/१७७०३/डी-१/ दिनांक १४.११.१९६९ अन्वये वाहनाचा कार्यक्षेत्राबाहेर वापर करण्यापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच शासन निर्णय ग्रा.वि.वि.क्र. जेईपी/१०/सीआर/५९/००/०५ दिनांक २४.४.२००० अन्वये पूर्वपरवानगी शिवाय त्यांचे वापरातील वाहन कार्यक्षेत्राबाहेर वापरल्यास कार्योत्तर मंजूरी अनुज्ञेय नाही.

शासन निर्णय वित्त विभाग क्र.प्रवास/१००५/प्रक्र३३/सेवा ५/दि.८.७.२००५ नुसार कार्यक्षेत्राबाहेरील प्रवासास एकूण किलोमीटर ११५२ ची रुपये ८/- प्रति कि.मी. प्रमाणे संबंधितांकडून रुपये ९,२१६/- वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

वसुलपात्र रक्कम रुपये ९,२१६/-

---

**परिच्छेद क्रमांक :- ११ :- लॉगबुकावर मा. गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी नसल्याबाबत.**

सन २००७ – २००८ मध्ये पंचायत समिती त्र्यंबकचे वाहन क्रमांक एम.एच. १५ ए.ए.५०२१ च्या लेख्यांची तपासणी केली असता अहवालासोबत जोडलेले परिशिष्ट क्रमांक १ नुसार वाहनाचा वापर गटविकास अधिकारी यांनी केल्याची नोंद लॉगबुकात नमुद आहे. परंतु त्यावर वाहनाचा वापर केल्याबाबत स्वाक्षरी नाही. वाहनचालक एम. बी. घाटे यांनी पंचायत समिती त्र्यंबक यांना पत्र देऊन स्वाक्षरी न केल्याबाबत सुचित केले आहे. मात्र त्यावर कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे खाजगी वापर समजून शासन निर्णय वित्त विभाग क्र. प्रवास १००५/ प्र.क्र.३३/सेवा-५/दिनांक ८.७.२००५ नसार प्रवासाचे एकूण कि.मी. १०१८८ ची रुपये ८/- प्रति कि.मी. प्रमाणे रक्कम रुपये ८१,५०४/- वसूल करुन योग्य त्या शिर्षाखाली भरणा करावेत. अथवा दिरंगाईबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे क्षमापन घेऊन पुर्ततेसह अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक :- १२ :- नविन परिभाषित अंशदान निवृत्त वेतन योजनेच्या अंमलबजावणीबाबत.**

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो-१००५/१२६/ सेवा – ४ दि. ३१.१०.२००५ व क्रमांक अंनियो-१००७/१८/सेवा-४ दिनांक ७.७.२००७ अन्वये राज्य शासनाने दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी नविन परिभाषित अशंदान योजना अंमलात आणली आहे. सदरच्या योजनेतंर्गत दिनांक १५ ऑगस्ट २००७ पूर्वी विहीत नमुन्यांतील अर्ज राज्य देखभाल अभिलेख अभिकरणाकडे सादर करुन लेखा क्रमांक प्राप्त करणे आवश्यक आहे.

पंचायत समिती त्र्यंबकचे सन २००७ – २००८ चे लेखापरीक्षण केले असता अर्धसमास पत्र क्रमांक १३ दिनांक २२.९.२००८ अन्वये प्राप्त झालेल्या माहितीनुसार पंचायत समिती त्र्यंबकेश्वर अंतर्गत ३४ कर्मचारी दिनांक १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेले आहेत.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) दिनांक १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेल्या ३४ कर्मचा-यांचे राज्य अभिलेख देखभाल अभिकरण यांच्याकडे नोंदणी करुन निवृत्ती वेतन लेखा क्रमांक प्राप्त करण्यांत आलेले नाहीत.

२)   या योजनेतंर्गत कर्मचा-यांकडून देय ठरणारे अंशदानाची १०% रक्कम रुपये ४६,३७४/- वसूल करुन अनामत लेखाशिर्षाखाली जमा घेण्यात आलेली आहे. वास्तविक सदरची रक्कम वेळोवळी शासन सदरी भरणा करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली नाही. त्यामुळे भविष्यात सदरच्या कर्मचा-यांना शासनाकडून देय ठरणा-या समतुल्य अशंदानाबाबत अडचणी निर्माण होऊ शकतात.

तरी याबाबत शासनाचे क्षमापन घेऊन वसूल करण्यांत आलेली रक्कम रुपये ४६,३७४/- शासन सदरी भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (क) खालील येणारी अनियमितता.

**निरंक**

---

## मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ९ (ड) खाली येणारी अनियमितता.

---

**परिच्छेद क्रमांक :- १३ :- थकित अग्रिम रक्कमेबाबत.**

या अहवालासोबत जोडण्यांत आलेल्या विवरणपत्र क्रमांक ३(अ) नुसार दिनांक ३१.३.२००८ अखेर रक्कम रुपये २,५८,१२५/- कार्यालयीन कर्मचारी / प्राथमिक शिक्षक यांचेकडे उत्सव, धान्य, प्रवास भत्ता, वेतन, पेट्रोल-डिझेल, पाणीपुरवठा इत्यादी प्रकारच्या अग्रीमाची रक्कम थकीत असल्याचे दिसून येते.

शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र.लेपअ/१०९२/ प्र.क्र.१४६९/३० दिनांक २६.२.१९९३ अन्वये दिलेल्या सुचनेनुसार गटविकास अधिकारी यांनी ठोस कार्यवाही करुन रक्कम रुपये २,५८,१२५/- वसुल करणेची उपाय योजना करावी आणि तसे अनुपालन लेखापरीक्षणात दाखवावे.

देण्यात आलेल्या अग्रिम रक्कमेची वसुली / समायोजन वेळीच होणे आवश्यक आहे. अग्रीम रक्कमांची वसुली वेळीच न झाल्यास जबाबदार असणारे अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द उचित कारवाई करुन त्यांचेकडून ही रक्कम वसुल करावी.

---

**परिच्छेद क्रमांक :- १४ :- अनामत नोंदवहीबाबत.**

सन २००७ – २००८ लेखापरीक्षण आर्थिक वर्षाचे अखेरीस शिल्लक असणाऱ्या अनामत रक्कमेचे विवरणपत्र प्राप्त झाले आहे. अनामत नोंदवही व विवरणपत्र क्र. ३ (ब) बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविणेत येत आहेत.

१) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता १९६८ चे नियम २१९ अन्वये विवरणानुसार सन २००३-२००४ व २००४-२००५ ची अनामत रक्कमा अनुक्रमे रुपये ३०,८८६/- व ७६,५२८/- व्यपगत केलेल्या नसल्याचे आढळून आले आहे.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषद, पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम २२० अन्वये ३ वर्षापर्यंत अदा न केलेल्या व व्यपगतही न केलेल्या रुपये १,०७,४१४/- चे अनामत विवरणपत्र मा. उपमुख्य लेखा परीक्षक(व.), स्थानिक निधी लेखा, नाशिक यांचेकडे दिनांक ३१.३.२००८ पूर्वी पाठवणे आवश्यक असतांना सन २००३ – २००४ व २००४-२००५ ची माहिती पाठविण्यात आलेली नाही. याबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी क्षमापन घ्यावे व ३ वर्षावरील अनामत रक्कमा व्यपगत करुन अनुपालन दर्शवावे.

---

**परिच्छेद क्रमांक :- १५ :- हातपंप व विद्युतपंप वर्गणी थकबाकी वसुलीबाबत.**

पंचायत समिती, त्र्यंबकेश्वरच्या सन २००७ – २००८ साठीच्या हातपंप / विद्युतपंप देखभाल दुरुस्ती वर्गणी नोंदवहीची पडताळणी केली असता यासोबतच्या परिशिष्ट क्रमांक २ मध्ये दर्शविणेत आलेप्रमाणे दिनांक ३१.३.२००८ अखेर हातपंप देखभाल दुरुस्ती वर्गणी रक्कम रुपये ३८,२००/- व विद्युतपंपाची वर्गणी रक्कम रुपये ७,३००/- अशी एकूण रक्कम रुपये ४५,५००/- अद्यापही ग्रामपंचायतीकडून वसुल करणे बाकी आहे. याबाबत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे आदेश क्रमांक भुजल १०९५/ प्र.क्र.२१७/४३ दिनांक १७.१.१९९६ अन्वये हातपंप / विद्युतपंपाची देखभाल व दुरुस्तीची प्रलंबित वर्गणी संबंधित ग्रामपंचायतीकडून रोख स्वरुपात अथवा देय अनुदानातून सत्वर वसुल करावी व पुर्तता लेखापरीक्षणात दाखवावी.

---

**परिच्छेद क्रमांक :- १६ :- बाह्यरुग्ण फी उशिरा भरणा केलेबाबत**

पंचायत समिती, त्र्यंबककडील खालीलप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्र रोकडवहीची तपासणी केली असता बाह्यरुग्ण फी खालीलप्रमाणे विलंबाने भरणा केल्याचे आढळले.

| बाह्यरुग्ण फी जमा केल्याचा कालावधी | रक्कम रुपये | भरणा केलेला दिनांक |
|---|---|---|
| **प्राथमिक आरोग्य केंद्र तोरंगण** | | |
| २.७.२००७ ते १२.८.२००७ | ३४० | १३.८.२००७ |

| प्राथमिक आरोग्य केंद्र चिंचओहोळ | | |
|---|---|---|
| ५.७.२००७ ते ७.८.२००७ | २,३७४ | ८.८.२००७ |

महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १३ अन्वये वसूल केलेली रक्कम दररोज जमा करणे आवश्यक आहे. नियम क्रमांक ४९ अन्वये उशिरात उशिरा १५ दिवसात रक्कमेचा भरणा करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही केलेली नाही. बाह्यरुग्ण फी जास्त दिवस हातात ठेवणे ही बाब नियमबाह्य असून उशिरा भरणा केलेबाबत मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे क्षमापन घेऊन पुर्तता दर्शवावी.

**परिच्छेद क्रमांक :- १७ :- मुदतबाह्य धनादेश रद्द न करणेबाबत.**

पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर सन २००७ — २००८ चे लेखापरीक्षण केले असता खालिलप्रमाणे धनादेशांची एक वर्षाची मुदत संपलेली असतांा अद्यापपावेतो रद्द केलेले नाहीत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे —

| अ.क्र. | धनादेश क्र. | दिनांक | रक्कम रुपये | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | ८६१० | २१.२.२००७ | २०० | जिल्हानिधी |
| २ | ८४२७ | २१.२.२००७ | १,००० | जिल्हानिधी |

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील नियम ३१ नुसार धनादेश दिल्यापासून एक वर्षाच्या मुदतीनंतर अशा धनादेशाची मुदत वाढवून घेतली नाही तर असा धनादेश रद्द करण्यांत यावा, अशी तरतुद आहे. परंतु पंचायत समिती, त्र्यंबकेश्वरने वरील धनादेशांची एक वर्षाची मुदत संपलेली असतांनाही सदरचे धनादेश रद्द केलेले नाहीत. तरी सदरचे धनादेश त्वरीत रद्द करुन आवश्यक त्या नोंदी कॅशबुक, काऊंटर फाईल व अनुरुप खर्च शिर्षाखाली घेऊन अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्रमांक :- १८ :- लघुपाटबंधारे उपविभाग त्र्यंबकेश्वर यांचेकडील नोंदवही क्रमांक ३९ व ४१ अपूर्ण असणेबाबत.**

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम क्रमांक ९७ अन्वये लघुपाटबंधारे विभागाने स्थावर मालमत्ता नोंदवही नमुना क्रमांक ३९ व ४१ मध्ये अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. तसेच नियम ९८ अन्वये सर्व स्थावर मालमत्तेची पडताळणी केल्याचे प्रमाणपत्र प्रत्येक वर्षी माहे जून मध्ये सक्षम कार्यालयांस सादर करणे आवश्यक आहे. त्र्यंबकला स्वतंत्र उपविभाग नाही. तरी कार्यरत उपविभागंकडून पंचायत समिती त्र्यंबक हद्दीतील सर्व मालमत्तांच्या नोंदी अद्ययावत घेतल्याची प्रमाणपत्रे घ्यावीत. तसेच त्यांनुसार ३० जून २००८ अखेर मालमत्ता प्रमाणपत्र सादर केल्याची खात्री पटवावी.

**<u>परिच्छेद क्रमांक :- १९ :- बांधकाम उपविभाग त्र्यंबकेश्वर यांचेकडील नोंदवही नमुना क्रमांक ३९, ४० व ४१ अपूर्ण असणेबाबत.</u>**

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम क्रमांक ९७ अन्वये बांधकाम विभागाने नमुना क्रमांक ३९, ४० व ४१ मध्ये स्थावर मालमत्तांच्या नोंदी अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. तसेच नियम ९८ अन्वये सर्व स्थावर मालमत्तेची पडताळणी केल्याचे प्रमाणपत्र प्रत्येक वर्षी माहे जून मध्ये सक्षम कार्यालयांस सादर करणे आवश्यक आहे. मालमत्ता पडताळणी प्रमाणपत्रात प्रत्यक्षा साठ्यांत उपलब्ध नसलेल्या वस्तूंसंबंधी स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. तसेच कोणतीही साहित्य समुचित मंजूरीशिवाय निर्लेखित करण्यांत आलेले नसल्याचे नमुद करणे आवश्यक आहे.

पंचायत समिती त्र्यंबकसाठी स्वतंत्र बांधकाम उपविभाग कार्यरत नाही. लगतच्या विविध बांधकाम उपविभागांमध्ये या पंचायत समितीचे कार्यक्षेत्र विभागले गेले आहे. तरी पंचायत समिती त्र्यंबक हद्दीतील सर्व प्रकारच्या नोंदी अद्ययावत व परिपूर्ण घेतल्याची प्रमाणपत्रे संबंधित सर्व उपविभागांकडून घ्यावीत. तसेच दिनांक ३० जून २००८ अखेरची वार्षिक मालमत्ता प्रमाणपत्रे त्यांनी जिल्हा परिषदेस सादर केली असल्यास त्यांसह पूर्तता दर्शवावी.

---

**<u>परिच्छेद क्रमांक :- २० :- पूर्ण केलेल्या कामांची नोंदवही न ठेवणेबाबत.</u>**

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम १९७ नुसार पंचायत समितीच्या बांधकाम उपविभागाने नमुना नंबर ६९ मध्ये पूर्ण केलेल्या कामांची नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यामध्ये प्रत्येक कामाचे नांव, कामाचे ठिकाण, काम सुरु झाल्याची तारीख, कामाचा एकूण खर्च, वार्षिक देखभालीचा अंदाजित खर्च व स्थावर मालमत्ता नोंदवहीतील संदर्भिय नोंदी घेण्याची तरतुद आहे. मात्र पंचायत समिती त्र्यंबकसाठी स्वतंत्र बांधकाम उपविभाग कार्यरत नाही. त्यामुळे त्र्यंबक पंचायत समिती कार्यक्षेत्रासाठी अशाप्रकारची स्वतंत्र नोंदवही अभिरक्षीत केलेली नाही.

तरी नमुना नंबर ६९ मध्ये सदरची नोंदवही त्र्यंबक पंचायत समिती कार्यक्षेत्रात कार्यरत बांधकाम उपविभागांची ठेवल्याचे व त्यांमध्ये अद्ययावत नोंदी घेतल्याची प्रमाणपत्रे प्राप्त करुन पुर्तता दर्शवावी.

---

**<u>परिच्छेद क्रमांक :- २१ :- करारपत्राची नोंदवही न ठेवणेबाबत.</u>**

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील नियम १४७ नुसार प्रत्येक मंजूर करारांची नमुना नंबर ४८ मध्ये नोंदवही परीरक्षीत करुन त्यामध्ये नोंद घेऊन प्रत्येक नोंदीखाली लेखाधिका-याने स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे पंचायत समितीने आजपावेतो कोणत्या कामासाठी कोणत्या मक्तेदाराबरोबर करार केलेले होते, कराराप्रमाणे विहित वेळेत काम पूर्ण झाले किंवा कसे इत्यादीबाबतची पडताळणी करता आलेली नाही.

तरी आजपावेतो केलेल्या कराराबाबतच्या नोंदी नमुना नंबर ४८ मध्ये घेऊन त्या नोंदीखाली सक्षम प्राधिका-याची स्वाक्षरी घेऊन अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्रमांक :- २२ :- निवृत्ती वेतन प्रदान नोंदवही अपूर्ण असणेबाबत.**

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ३९ परिशिष्ट ४ मधील नियमान्वये पंचायत समितीत येणा-या प्रत्येक मागणी बिलाची व नोंदवहीची गट विकास अधिकारी याने प्रदान आदेशावर सही करण्यापूर्वी कनिष्ठ लेखा अधिका-यांकडून तपासणी होणे आवश्यक आहे.

पंचायत समिती त्र्यंबकेश्वर यांचेकडील गटशिक्षण अधिकारी यांचे कार्यालयांतील निवृत्ती वेतन देयके, निवृत्ती वेतन लेखापरीक्षण नोंदवही (ए.पि.पि.९) आणि उपदान व अंशराशीकरण नोंदवही (नमुना ए.पी.पी. १०) यांची तपासणी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे अपूर्णता व तृटी आढळून आलेल्या आहेत.

१. नमुना ए.पी.पी. ९ मधील लेखा परीक्षण नोंदवहीत निवृत्ती वेतनाचा प्रकार, निवृत्ती वेतन सुरु झाल्याचा दिनांक, अशंराशीकरण केलेली रक्कम व प्रदानाचा दिनांक, मुळ निवृत्ती वेतन, अशंराशीकरणानंतरची रक्कम, महागाई भत्त्याचे दर, मासिक एकत्रित निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाचे दर, निवृत्ती वेतनधारक मृत्यू पावल्यास मृत्यूची नोंद, वारसांची नोंद, प्रत्येक महिन्यांत किती निवृत्ती वेतन प्रदान केलेले याची नोंद व तपासणी केल्याबद्दल लेखाधिकारी यांची स्वाक्षरी, जिवीत प्रमाणपत्राची नोंद, पुनर्विवाहाची / पुनर्नियुक्तीची नोंद, वयांची ६५ वर्षे पूर्ण किंवा मृत्यूनंतर ७ वर्षे यांपैकी जे अगोदर घडले असेल इत्यादी संबंधीच्या तारखा, मृत्यूनंतरच्या जादा प्रदान केलेल्या रक्कमा बँकेकडून परत मागवून शासन सदरी भरणा केल्याबद्दलच्या चलनासह नोंदी, अशंराशीकरणानंतर १५ वर्षांनी पुनर्स्थापना केल्याबाबतच्या नोंदी, चौथ्या, पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारीत निवृत्ती वेतन आदेशाप्रमाणे सुधारीत निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्ती वेतनाच्या नोंदी बँकेचे नाव व खाते क्रमांक इत्यादी नोंदी परिपूर्ण घेण्यांत आलेल्या नसल्यामुळे निवृत्ती वेतन धारकांस / कुटूंब निवृत्तीवेतनधारकांस योग्य प्रदान झाले किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणांत परिपूर्ण पडताळणी करता आलेली नाही.

२. बँकेमार्फत निवृत्तीवेतन घेणा-या निवृत्तीवेतनधारकास प्रत्येक वर्षी जीवीत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जीवीत प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास त्या निवृत्ती वेतन धारकास निवृत्ती वेतन प्रदान करण्याचे थांबवावे, असे नियम असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे तपासणी आढळून आलेले नाही.

३. नियम ८० अन्वये ज्या कुटूंब निवृत्तीवेतनधारकाचे निवृत्ती वेतन विवाहानंतर व पुनर्विवाहानंतर बंद होणार आहे. त्यांच्याकडून नमुना ए.पी.पी. १४ मध्ये दर सहामाहीस प्रतिज्ञापत्र मागविण्यांत येऊन ते डिसेंबर व जून मध्ये देय होणा-या निवृत्ती वेतन बिलासोबत जोडण्यांत यावे. असे प्रमाणपत्र देण्यात कसूर झालेल्या प्रकरणांचे सविस्तर विवरण जानेवारी व जूलै महिन्यांत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचकडे सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

४. निवृत्ती वेतन आदेशांत निवृत्ती वेतन धारकांचे फोटो, स्वाक्षरीचे नमुने, सुधारीत निवृत्ती वेतनाचे आदेश इत्यादी प्रकारचे अत्यावश्यक कागदपत्रे नस्तीबध्द केलेली नाहीत.

५. निवृत्ती वेतन बिल, निवृत्ती वेतन प्रदान आदेश व निवृत्त वेतन लेखा परीक्षा नोंदवहीतील नोंदी यामध्ये संदर्भिय नोंदवही क्रमांक, पृष्ठ क्रमांक यांची नोंद घेण्यात आलेली नाही. त्यामुळे संदर्भांकित लेखे तपासणीस लेखा परीक्षणात बराच कालावधी व श्रम व्यर्थ खर्च करावे लागत आहेत.

सदरचे नमुना ए.पी.पी. ९ व इतर अभिलेखे वेळीच पूर्ण न केल्याने योग्य प्रदाने झाल्याची पडताळणी लेखापरीक्षणांस करता आली नाही. या महत्त्वाच्या नोंदवह्या अपूर्ण ठेवणे ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. याबाबत संबंधित कर्मचारी व अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करावी.

उपरोकत आक्षेपांबाबत अंतर्गत लेखापरीक्षणाकडून उचित पडताळणी करुन त्यांचा अहवाल व त्यावरील कार्यवाही अहवालासह निवृत्ती वेतन लेखा परीक्षा नोंदवही व सर्व आदेश नोंदवहीसह अद्ययावत पुर्तता लेखापरीक्षणांस दर्शवावी.

**परिच्छेद क्रमांक :- २३ :- अपूर्ण विहीरी बांधकामाबाबत (कृषी विभाग-त्र्यंबकेश्वर)**

कृषि विभाग, त्र्यंबकेश्वरने सन २००७ – २००८ मध्ये कृषि विभागांतर्गत टी.एस.पी. व एस.सि.पी. योजनांतर्गत घेतलेल्या काही विहीरींची बांधकामे सन २००४ – २००५ पासून आजपावेतो अपूर्ण स्थितीत आहेत. याबाबतची माहिती सोबतच्या परिशिष्ठ क्रमांक ३ मध्ये नमुद आहे. अपूर्ण स्थितीत असलेल्या विहिरींच्या खर्चावरील तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | योजनेचे नाव | मंजूरीचे वर्ष | अपूर्ण विहीरी | आजपावेतो केलेला खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | एस. सी. पी. | २००४ – २००५ | १ | ५,७५५ |
| २ | एस. सी. पी. | २००५ – २००६ | १ | २५,६४६ |
| ३ | एस. सी. पी. | २००६ – २००७ | १ | २३,९५५ |
| ४ | एस. सी. पी. | २००७ – २००८ | २ | ८०,५३० |
| ५ | टि. एस. पी. | २००६ – २००७ | ४ | १,०५,०७१ |
| ६ | टि. एस. पी. | २००७ – २००८ | ११ | २,४२,८२१ |
| | | **एकूण** | **२०** | **४,८३,७७८** |

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

१) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. जाविका-१२९८/प्र.क्र. १०४/ रोहयो-१०/दिनांक १.७.१९९८ मधील परिच्छेद क्रमांक १७ व १८ नुसार विहीरीचे काम प्रशासकीय मान्यतेच्या आदेशातील दिनांकापासून २ महिन्याचे आत सुरु करुन पुढील १२ महिन्याचे आत काम पूर्ण करावयाचे असतांना त्याप्रमाणे शासनाचे आदेशाचे पालन झालेले नाही. याबाबत शासनाचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

२)  कृषी उपविभागतील एकूण २० विहिरींचे काम अपूर्ण् आहे. सदरील कामे वेळीच पूर्ण झालेली नसल्यामुळे त्यावरील आजपावेतो करण्यांत आलेला खर्च रुपये ४,८३,७७८/- व्यर्थ जाण्याची शक्यता आहे. याबाबत अवर सचिव, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक ६५ दिनांक १३.९.२००१ अन्वये प्रत्येक लाभार्थ्यांकडून विहीत मुदतीत पूर्ण न झालेल्या कालावधीपासून १८% दराने व्याज आकारणीची दंडनीय कारवाई करण्यात यावी.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पूर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

---

**<u>परिच्छेद क्रमांक :- २४ :- जवाहर विहिरींच्या अपूर्ण बांधकामाबाबत</u>**

पंायत समिती, त्र्यंबकेश्वर अंतर्गत सोबतच्या परिशिष्ठ क्रमांक “ ४ ” मध्ये नमुद केल्याप्रमाणे एकूण २१ विहिरींची कामे अद्यापपावेतो अपूर्ण स्थितीत आहेत. सदरच्या अपूर्ण २१ विहिरींच्या कामावर मार्च २००८ अखेरपावेतो रक्कम रुपये ४,७४,६६७/- खर्च करण्यांत आलेला आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहे.

१)  महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक जाविका-१२९८/ प्र.क्र.१०४/रोहयो-१० दिनांक १.७.१९९८ मधील परिच्छेद क्रमांक १७ व १८ नुसार विहिरीचे काम प्रशासकीय मान्यतेच्या आदेशातील दिनांकापासून २ महिन्याचे आत सुरु करुन पुढील १२ महिन्याचे आत काम पूर्ण करावयाचे असतांना त्याप्रमाणे शासनाचे आदेशाचे पालन झालेले नाही. तरी याबाबत शासनाचे क्षमापन घेऊन अनुपालन दर्शवावे.

२)  हरसुल उपविभागातील एकूण २१ विहिरींचे काम अपूर्ण आहे. सदरील कामे वेळीच पूर्ण झालेली नसल्यामुळे त्यावरील आजपावेतो करण्यांत आलेला खर्च रुपे ४,७४,६६७/- व्यर्थ जाण्याची शक्यता आहे. याबाबत अवर सचिव, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक ६५ दिनांक १३.९.२००१ अन्वये प्रत्येक लाभार्थ्यांकडून विहीत मुदतीत पूर्ण न झालेल्या कालावधीपासून १८% दराने व्याज आकारणीची दंडनीय कारवाई करण्यात यावी.

३)  सन २००७ – २००८ मध्ये नविन विहिरींचा लक्षांक दिलेला असतांना त्याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. याबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन शासनाचे क्षमापनासह अनुपालन दर्शवावे.

वरीलप्रमाणे आक्षेपांची पूर्तता करुन अनुपालन दर्शवावे. तोपर्यंत रक्कम रुपये ४,७४,६६७/- शासकीय अनुदानासाठी तात्पुरती अमान्य करण्यांत येत आहे.

लेखाशिर्ष<br>
जवाहर रोजगार योजना अनुदान<br>
लघुपाटबंधारे विहिरी<br>
तात्पुरती अमान्य रक्कम रुपये ४,७४,६६७/-

---

**परिच्छेद क्रमांक :- २५ :- आक्षेप विवरणपत्र**

किरकोळ स्वरुपाच्या आक्षेपांची लेखापरीक्षण काळातच पुर्तता करुन घेतल्याने आक्षेप विवरणपत्र निर्गमित केलेले नाही.

---

**परिच्छेद क्रमांक :- २६ :- विवरणपत्रे.**

अहवालासोबत जमाखर्चाचे विवरणात तफावत असल्याने जोडता आले नाही. उर्वरित आवश्यक ती विवरणपत्रे या अहवालासोबत जोडणेत आलेली आहे.

---

**परिच्छेद क्रमांक :- २७ :- अनुपालन व पोहोच.**

या लेखा परीक्षण अहवालातील आक्षेपांचे अनुपालन, मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम १०(१) प्रमाणे हा लेखा परीक्षण अहवाल प्राप्त झालेपासून चार महिन्याच्या आंत पंचायत समितीच्या ठरावाच्या प्रतीसह तीन प्रतीत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नाशिक यांचे स्वाक्षरीने या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे. तसेच हा अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक कळवून पोहोच देण्यात यावी.

(वि.ए.कोते)
उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक

**प्रत सविनय सादर :-**

१. मा. सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई (पत्राने)
२. मा. महालेखापाल, बाहय लेखा परीक्षण विभाग, मुंबई
३. मा. आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक
४. मा. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, नवीमुंबई
५. मा. उपमुख्य लेखा परीक्षक(वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, नाशिक विभाग, नाशिक

**प्रत अग्रेषित :**

६. म. उपमुख्य लेखा परीक्षक (पंरास), स्थानिक निधी लेखा, मुंबई
७. म. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर

उपमुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, नाशिक